# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१
दुरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र. मजीप्रा/सस/सभा-११२/ दिनांक : १४ जानेवारी, २००९

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ११२ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ११२ वी बैठक दिनांक १३ जानेवारी, २००९ रोजी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त यासोबत मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे. कृपया त्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

सोबत : इतिवृत्त.

( संजय दहासहस्त्र )
सदस्य सचिव

मा. मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :

B.M.Letters/9

पापु-२००२
१५/१/०९

पुढील कारवाई करण्यात यावी.

19-1

त्वरित
का.अ./आस्था ४
१२.१.०९

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११२ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११२ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १३/१/२००९ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.श्री.हसन मुश्रीफ, राज्य मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
३. श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. प्रधान सचिव, (वित्त व सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.प्र.ना. मुदखेडकर, उप सचिव, (उर्जा) उर्जा विभाग मंत्रालय, मुंबई-३२
६. सचिव,ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने सौ.मा.प्र.कुलकर्णी, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१) श्री.व्ही.आर. कल्याणकर, विशेष कार्य अधिकारी तथा मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) श्रीमती जयलक्ष्मी चेक्कला, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
४) श्री. बा.शि. पाटील, प्रभारी वि.स. व मु.ले.अ. तथा उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
५) श्री. द. चि. सूर्यवंशी, प्रभारी मुख्य अभियंता, ठाणे तथा अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., ठाणे
६) श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

मा.मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १११ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २६.ऑगस्ट, २००८ रोजी संपन्न झालेल्या १११ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १११ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २००८ रोजी संपन्न झालेल्या १११ व्या बैठकीचे जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळात अवगत करण्यांत आल्यानंतर केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

या मुद्यांबाबत सदस्य सचिवांनी बैठकीपुढे उहापोह केला. याबाबत मा.मंत्री महोदय तथा मजीप्रा अध्यक्ष यांनी व्याजाचे दर वाढले आहेत त्याचा गुंतवणूक करतांना विचार करावा तसेच सध्या कोणत्याही बँकेमध्ये गुंतवणुक करण्यापूर्वी वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार तपासणी करुनच गुंतवणूक करावी असे सुचविले. त्याचप्रमाणे ज्या दिवशी शासनाच्या वित्त विभागामार्फत अशा गुंतवणूकीबाबत निर्णय जाहिर होतील व ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होतील त्याच दिवसापासून गुंतवणूक वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करावी व त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीची वाट पाहू नये मात्र त्यास कार्योत्तर मंजूरी घ्यावी असे निर्देश दिले. याबाबत चर्चा होवून दिनांक ५.८.२००८ ते १०.१२.२००८ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली. तसेच मुदतपूर्व काढून घेण्यात आलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात येवून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.४ : पिंपरी (मेघे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (९ गांवे) ता. व जि.वर्धा या योजनेच्या सुधारित आकृतीबंधानुसार लोकवर्गणीसाठी रक्कम नळजोडणी धारकांकडून नळजोडणीपोटी उपविधीनुसार घ्यावयाच्या विविध शुल्का व्यतिरिक्त ना परतावा रक्कम म्हणून आकारणी करण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. चर्चेदरम्यान, सदरच्या योजनेची लोकवर्गणी म.जी.प्रा.ने उभारावयाची असा निर्णय यापूर्वीच्या बैठकीत जरी झाला असला तरी शासनाच्या धोरणानुसार १०% लोकवर्गणी जमा केल्याशिवाय अशा योजना मजीप्राने राबवू नयेत. कारण या निर्णयानुसार इतर स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.ने लोकवर्गणी उभारुन पूर्ण कराव्यात अशी मागणी करतील. त्याचप्रमाणे असा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणे अत्यावश्यक असल्याचे मा.अध्यक्षमहोदयांनी नमूद केले.

| | |
|---|---|
| **मा. अध्यक्ष तथा** | **सदस्य सचिव** |
| **मंत्री, पा.पु. व स्व.** | **म.जी.प्रा.** |

सदर चर्चेदरम्यान या योजनेत समाविष्ट वायगांव (निपाणी) या गावाचा समावेश न करता या गावाची लोकसंख्या कमी असल्याने या गावासाठी वेगळी योजना करणे योग्य होईल असे मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी नमूद करुन मजीप्राची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने, म.जी.प्रा.ने लोकवर्गणी उभारुन अशा योजना राबवू नयेत असे निदर्शनास आणून दिले.

अंतिमत: चर्चेअंती सदरचा प्रस्ताव सद्यस्थितीत स्थगित ठेवून योग्य तो विचारविनिमय करुन पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.५: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता संवर्गातील अभियंत्यांना उत्कृष्ट अभियंता म्हणून गौरविण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी सदर संचालक मंडळास अवगत केले. याबाबत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनीही सदर योजना चांगली असून, अशा प्रकारचे पुरस्कार दिल्याने अभियंते उत्साहाने कामे करतील असेही सांगितले. याबाबत मा.मंत्री महोदय तथा मजीप्रा अध्यक्ष यांनी उत्कृष्ट अभियंता गुणगौरव योजना चांगली असून, उत्कृष्ट अभियंत्याची निवड करण्यासाठी गठीत केलेल्या समितीत उत्कृष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करावा व काटेकोरपणे **"उत्कृष्ट अभियंता"** म्हणून योग्य त्या अभियंत्याचीच निवड समितीने निवड करावी असे निर्देश दिले.

सदर सोहळयासाठी येणारा खर्च हा जलसंपदा विभागाच्या धर्तीवर काही रक्कम मुदत ठेवीमध्ये जमा करुन त्यामधून मिळणाऱ्या व्याजातून भागविता येईल या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. याबाबत चर्चा होऊन उत्कृष्ट अभियंता गुणगौरव समारंभ चक्री पध्दतीने आयोजन करणे तसेच उत्कृष्ट अभियंता गुण गौरव पुस्तिका प्रशस्तीपत्र व मानचिन्ह यासाठी प्रत्येक वर्षी अपेक्षीत खर्च रु.१.५० लाख व तीन वर्षातून रु.२.५० लाख इतका खर्च धरण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र.६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चित्रशाखेतील / भांडारशाखेतील कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून राज्य वेतन सुधारणा समिती १९९७ च्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीमधील मुद्दाबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळापुढे उहापोह केला. याबाबत मा.मंत्री महोदय तथा मजीप्रा अध्यक्ष यांनी मजीप्राची आर्थिक परिस्थिती ठिक नाही तसेच कामेही नसल्यामुळे ५ व्या वेतन आयोगानुसार चित्रशाखा व भांडारशाखेतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे उचित ठरणार नाहीं असे सुचित केले. याबाबत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी संचालक मंडळाच्या असे निदर्शनास आणून दिले की, ५ व्या वेतन आयोगाच्या

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सुधारित शिफारशीनुसार सर्व विभागाने वेतनश्रेणी लागू केली असून मजीप्राच्या कर्मचाऱ्यांना अशी वेतनश्रेणी लागू न करणे अन्यायकारक ठरेल. सबब मजीप्राच्या वरील कर्मचाऱ्यांस राज्य वेतन सुधारणा समितीच्या शिफारशीनुसार लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी असे संचालक मंडळास अवगत केले. संचालक मंडळाने सर्वानुमते सदर कार्यक्रम बाब लागू करण्यांस मान्यता दिली असून या संदर्भात, शासनाची मंजुरी घेण्यासाठी मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.७ :**

**अ) सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने वेतन सुधारणापूर्व अग्रीम अदा करणेबाबत.**

**ब) सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने निवृत्ती वेतन कुटूंब निवृत्ती वेतन सुधारणापूर्व अग्रीम अदा करणेबाबत.**

**अ)** या मुद्याबाबत मा.मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. याबाबत उप सचिव, वित्त विभाग तथा मजीप्राचे सदस्य यांनी असे सूचित केले की, सदर योजना लागू करण्यापूर्वी वित्त विभागाची मान्यता घेतली होती का? याबाबत तत्कालीन परिस्थितीत वित्त विभागाची मान्यता न घेता मजीप्राच्या सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार कमीत कमी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार) अथवा दोन महिन्यांचे मूळ वेतनाइतकी रक्कम अदा करण्याचा स्वतंत्र प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर करण्यात येवून सदरची रक्कम अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला व ही रक्कम अदा करण्यात आली आहे. तथापि हा निर्णय खालील अटींच्या अधीन राहून घेतला असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

१. म.जी.प्रा.स ६ वा वेतन आयोग लागू होणार किंवा कसे याचा निर्णय प्राधिकरणाच्या बैठकीत घेणे आवश्यक आहे. असा निर्णय झाल्यास त्या अनुषंगाने जो आर्थिक भार येईल तो शासनाकडून देण्यात येणार नाही.
२. सुधारणापूर्व अग्रीम हे म.जी.प्रा.स, म.जी.प्रा.च्या पुनर्गठनासंबंधीच्या कार्यवाहीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे. सदर अग्रीमासाठी शासनाकडून कोणताही निधी दिला जाणार नाही.
३. म.जी.प्रा.तील अतिरिक्त कर्मचारी/अधिकारी वर्ग जिल्हापरिषद/भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा वा शासनाच्या इतर विभागात प्रतिनियुक्तीवर, कायमस्वरुपी पाठवावा लागेल.
४. म.जी.प्रा.तर्फे निर्भय योजनेअंतर्गत थकबाकी जास्तीत जास्त प्रभावी करण्याबाबत प्रयत्न करण्यात यावा.
५. जर सहावा वेतन आयोग म.जी.प्रा.ला लागू झाला नाही तर सदर अग्रीमाची वसुली/समायोजन संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या वेतनातून केली जाईल.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

यावर चर्चा होऊन म.जी.प्रा.ने घेतलेल्या निर्णयास संचालक मंडळाने कार्योत्तर मान्यता प्रदान केली.

ब) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांस ६ वा वेतन आयोग यदाकदाचित लागू करण्यात आला नाही तर सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकडून अग्रीमाची वसुली करणे कठीण होईल ही बाब विचारात घेता, तसेच बव्हंशी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी हे त्यावेळच्या शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी असल्याने सदरहू प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले.

उपरोक्त दोन्ही निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**